अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# महिलांसाठी गुजरातमध्ये आनंदी प्रयोग

एकीकडे महाराष्ट्रात मराठा समाजाला आणि मुस्लिमांना आरक्षण देण्याचा निर्णय होत असतानाच तिकडे शेजारी गुजरात राज्यात महिलांना पोलीस दलात ३३ टक्के आरक्षण देण्याची ऐतिहासिक घोषणाही झाली. गुजरातच्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल यांनी यासंदर्भात पुढाकार घेऊन लगोलग त्याची अंमलबजावणीही सुरू केली. एखाद्या राज्याच्या महिला मुख्यमंत्र्यांनी महिलांसाठी आणि विशेषतः पोलीस दलामध्ये तब्बल ३३ टक्के आरक्षणासाठी पुढाकार घ्यावा ही गोष्ट निश्चितच ऐतिहासिक ठरते. एवढेच नव्हे तर एकूणच देशाच्या सामाजिक जीवनामध्ये वेगळे उदाहरण घालून देणारीही ठरते. आतापर्यंत राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे म्हणून गदारोळ सुरू होता. अजूनही केंद्रीय पातळीवर महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करायला अनेकांचा राजकीय विरोध आहे. देशात आज सर्वच क्षेत्रांमध्ये महिला आघाडीवर असतात. राजकारणात तर त्यांचे स्थान दिवसेंदिवस अधिक बळकट होत आहे. आजच्या घडीला तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि गुजरात या तीन राज्यांच्या मुख्यमंत्रीपदी महिला आहेत. देशाचे सर्वोच्च सभागृह मानल्या जाणाऱ्या लोकसभेच्या अध्यक्षपदीसुध्दा महिलाच विराजमान आहेत. परंतु या महिला नेतृत्वाने महिलांसाठी काही ठोस योजना राबवल्याचे आढळून येत नाही. विशेषतः सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना पुरुषांइतकेच प्राधान्य मिळाले पाहिजे, असा निर्णयदेखील यापैकी एकाही महिला मुख्यमंत्र्यांनी आतापर्यंत घेतला नाही. एकीकडे महिला सशक्तीकरणाच्या गप्पा मारल्या जातात. परंतु प्रत्यक्ष कृती मात्र दिसत नाही. खरे तर ज्या राज्यांच्या मुख्यमंत्रीपदी महिला आहेत त्या राज्यांमध्ये तरी महिलांचे सशक्तीकरण ठळकपणे दिसून यायला हवे. राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळो ना मिळो, परंतु एकूण राज्य कारभारामध्ये किंवा प्रशासनामध्ये जरी ते मिळाले तरी ते एकूणच सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने मोठे पाऊल ठरू शकेल. गुजरातने या दिशेने एक पाऊल टाकल्याचे म्हणता येईल. विशेषतः पोलीस दलासारख्या खाकी वर्दी घालून काम करण्याच्या क्षेत्रात महिलांना ही संधी दिली गेली हे निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल. याचा अर्थ गुजरातमध्ये महिलांच्या बाबतीत सर्वच उत्तम परिस्थिती आहे असे समजण्याचे कारण नाही. परंतु देशातील एका महिला मुख्यमंत्र्याने पोलीस दलामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा पहिला मान मिळवला हे नाकारता येणार नाही.

## महाराष्ट्रात नुसतीच महिलांसाठी धोरणे

खरे तर अनेक सुधारणावादी चळवळींमध्ये महाराष्ट्र हा देशात अग्रेसर राहिला आहे. त्यातही महिलांना शिक्षण देण्यासाठी सर्वप्रथम तिथे चळवळ सुरू झाली. अगदी विधवांच्या पुनर्विवाहांना परवानगी देण्यासाठी इथेच पहिले पाऊल टाकले गेले. महाराष्ट्रातल्या स्वायत्त महिला विद्यापीठाची स्थापना हासुध्दा भारतातील पहिला प्रयोग महाराष्ट्रात झाला. एवढेच नव्हे तर महिलांसाठी स्वतंत्र शासकीय धोरण ठरवण्याचा मानसुध्दा महाराष्ट्राला मिळाला होता. त्याबाबतचे दुसरे महिलाविषयक धोरणही गेल्याचवर्षी जाहीर झाले. परंतु या धोरणामध्येसुध्दा सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याची तयारी दाखवली गेली नाही. फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांसाठी थेट पन्नास टक्के आरक्षण घोषित करण्याबाबत महाराष्ट्राने पुढाकार घेतलेला दिसून येतो. परंतु समाजातील ऐंशी टक्के वर्ग विविध प्रकारच्या रोजगाराच्या शोधामध्ये असतो. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण जर लक्षात घेतले तर त्यांच्या रोजगाराच्या आरक्षणाबाबत अधिक ठाम भूमिका घेतली जाणे अपेक्षित आहे. नुसती महिला धोरणे जाहीर करून होणार नाही. तर प्रत्यक्ष कृती होणे गरजेचे आहे. आज महाराष्ट्राच्या पोलीस दलात महिलांची भरती केली जाते. परंतु ते प्रमाण पुरुषांच्या तुलनेमध्ये नगण्यच म्हणायला हवे.गुजरात हे महाराष्ट्राच्या शेजारचे राष्ट्र असल्यामुळे अशा प्रकारची तुलना स्वाभाविक ठरते. ज्या महाराष्ट्रात महिलांच्यासाठी सर्वाधिक आणि सर्वप्रथम सुधारणा चळवळी झाल्या. महिलांना समान वागणूक मिळावी, अशा प्रकारचा विचार सर्वप्रथम ज्या महाराष्ट्रात रुजवला गेला. त्या महाराष्ट्रात मात्र अजूनही महिलेकडे मुख्यमंत्रीपद येऊ शकलेले नाही. याचा अर्थ राजकारणात आणि प्रशासनातही महाराष्ट्रात बऱ्यापैकी पुरुषप्रधानता आहे असे म्हणणे भाग पडते. राज्याचे नेतृत्व महिलांकडे सोपवण्याबाबत अजूनही इथले राजकारण प्रगल्भ किंवा समजूतदार झालेले नाही. इतर राज्यांचा अनुभव लक्षात घेऊन तरी अशा प्रकारचे नेतृत्व पुढे आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न राजकारणातल्या धुरिणांनी करायला हरकत नाही. केवळ धोरणांमधून दिसणारे पुढारलेपण हे महिला सक्षमीकरणाबाबत अर्धसत्यच ठरते. ते पूर्ण सत्य व्हायचे असेल तर राजकारणासह विविध क्षेत्रांत महिलांना समान न्याय मिळाला पाहिजे.

## मोदींसाठीही धडा

गुजरातचे मुख्यमंत्रीपद एका महिलेकडे सोपवून नरेंद्र मोदींनी काही प्रमाणात राजकीय परिपक्वता दाखवली. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी केलेल्या भाषणांमध्ये महिलांच्या सशक्तीकरणाचा त्यांनी वारंवार उल्लेख केलेला आढळतो. राज्याचे मुख्यमंत्रीपद महिलेला देताना त्यांनी आपला उद्देश जर स्पष्ट केला आणि गुजरातच्या मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल यांनी आपल्यावर मोदींनी दाखवलेला विश्वासही सार्थ केला. पोलीस दलात ३३ टक्के महिलांना आरक्षण देण्याची त्यांची घोषणा त्याचाच एक भाग ठरतो. आता मोदींनीच आनंदी पटेल यांच्याकडून धडा घ्यायला हवा. आणि देशपातळीवर किंवा केंद्रीय पोलीस दलांमध्ये महिलांना असेच ३३ टक्के आरक्षण देण्याची घोषणा त्यांनी करायला हवी. केवळ भाषणांमधून महिलांविषयी नुसती कणव दाखवून चालणार नाही. तर त्याची प्रत्यक्ष उदाहरणे समोर आली पाहिजेत. गुजरात हे जर देशातील अशा प्रकारचे पहिले राज्य ठरत असेल तर केंद्रीय पोलीस दलामध्ये महिलांना असेच ३३ टक्के आरक्षण देण्याची घोषणा करणारे मोदी हेच पहिले पंतप्रधान ठरू शकतात. समाजातल्या महिला पुरुष समानतेच्यादृष्टीने अशा प्रकारचा हा एक सामाजिक प्रयोग वेगळा दिशादर्शक ठरू शकतो. गुजरातमधल्या महिलांना आनंद देणारा हा आनंदी प्रयोग मोदींनादेखील संधी देणारा म्हणावा लागेल. याशिवाय महाराष्ट्रासारख्या राज्यालादेखील त्यातून निश्चितच धडा घेता येऊ शकतो. राजकारणापेक्षा प्रशासनातले हे आरक्षण अधिक मोलाचे आणि उपयुक्त ठरणारे आहे. राजकीय आणि सरकारी पातळीवर त्याचा निश्चित विचार झाला पाहिजे.